# ऋणनिर्देश


शिवाजी विद्यापीठाच्या एम.फिल. (मराठी) पदवीसाठी 'कृष्णराव भालेकर यांच्या साहित्याचा अभ्यास' या विषयावरील हा लघुप्रबंध सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. हे संशोधन पूर्ण करण्यासाठी ज्या ज्या व्यक्तिंचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाले, त्या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे.

माझ्या लघुप्रबंधाच्या मार्गदर्शिका डॉ. छाया पोवार यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करते त्यांच्या प्रेमळ सहवास आणि मराठी साहित्याचा व्यासंग यातून मी खूप काही शिकले. जे माझ्या भविष्यासाठी मार्गदर्शक व प्रेरक ठरेल. तसेच डॉ. विलास पोवार सर यांचेही मार्गदर्शन मला मिळाले. मी त्यांच्या ऋणात राहणेच पसंत करते. त्यांच्या मुली कु. प्रज्ञा व प्राची यांचेही सहकार्य लाभले.

शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. रवींद्र ठाकूर, डॉ. रणधीर शिंदे, प्रा.हिमांशू स्मार्त यांचेही वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले. तसेच विभागातील लिपिक विनय पाटील, सेवक सतीश कुसुंबे, रमेश पवार, श्री. सुर्यवंशी, सौ. शिरगांवकर यांनी वेळोवेळी योग्य ते सहकार्य केले त्यांचेही ऋण व्यक्त करते.

त्याचप्रमाणे डॉ. कन्हैया कुंदप, डॉ.सौ. सुलक्षणा कुलकर्णी, डॉ.डी.आर. गायकवाड, डॉ. अरुण शिंदे, प्रा.टी.डी. पाटील यांच्याशी वेळोवेळी केलेली चर्चा मला लघुप्रबंधासाठी उपयुक्त ठरली. तसेच श्री. विकास कांबळे सर, श्री. संदीप तावरे सर, श्री. रवींद्र जाधव यांच्या प्रोत्साहनामुळे मी लघु प्रबंध पूर्ण करु शकले.

त्याचबरोबर माझ्या मित्रमैत्रिणी सौ. मनिषा घोलप, कु. कल्पना पाटील, आशा तुपेरे, शुभांगी मुळीक, विश्रांती पवार, सारिका मोहिते, अंजना करांडे, शाहीन मुजावर, प्रतिभाराणी माने, रेशमा चव्हाण, सौ. प्रीती पवार, श्री. मारुती तुपेरे, संतोष काळे, सचिन औताडे, योगेश चव्हाण, अमित साळोखे, नौबत कोलप, नामदेव कांबळे, शरद, प्रवीण यांच्या मोलाच्या सहकार्याबद्दल त्यांचे मनापासून आभार.

याचबरोबर ज्यांनी उन्हातान्हांची, थंडी, वाऱ्याची तमा न बाळगता काबाडकष्ट करुन माझे शिक्षण पूर्ण केले. ते माझे आजोबा, तीर्थरुप आई-वडील, दादा, काकी, मावशी, काका, आत्या, मामा यांच्या ऋणांना बंदिस्त करण्याएवढे शब्द माझ्याकडे नाहीत. तसेच माझ्या बहिणी कु. रुपाली व अर्चना, सौ. माया जाधव, त्याचबरोबर भाऊ सुरज, सुहास, सुमीत, शुभम, तेजश्री, गौरवी, विनोद देवकर, नितीन देवकर, सौ. दीपा वहिनी, गणेश ठोंबरे, महेश ठोंबरे, श्रीमती अनुसया ठोंबरे यांना मी विसरु शकत नाही.

'मागेल त्याला काम' या योजनेत काम मिळाल्याने आणि डी.एस.डब्ल्यू. प्रेस विभाग आणि बी.यू.टी.आर. विभागातील कर्मचाऱ्यांनी दिलेल्या सहकार्यामुळे मला या लघुप्रबंधाचे काम पूर्ण करता आले.

शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयातील व स.गा.म. कॉलेज ग्रंथालयातील पुस्तकांमुळे मी हे काम पूर्ण करु शकले. या ग्रंथालयाचे ग्रंथपाल व सर्व कर्मचारी वर्ग यांचेही मी आभारी आहे. तसेच श्रीकांत कॉम्प्यूटर्स कोल्हापूर यांनी लघुप्रबंधाचे तत्परतेने टाईपींगचे काम करुन दिल्याबद्दल त्यांचेही आभार.

कु. मनिषा आण्णा दळवी